# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४**

## आदिवासी विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २१**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ७३,५५,५८,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (१) | ६३६४ | १० | राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी या तालुक्यांचा समावेश असून हे चारही तालुके आदिवासी, अतिदुर्गम व डोंगराळ भागात मोडत असून या तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी कोलाम समाजातील नागरिक वास्तवास आहेत. या मतदार संघात मोठ्या प्रमाणात पेसाच्या ग्राम पंचायती असून ५० % पेक्षा जास्त अनुसूचित जमाती लोकसंख्या असलेल्या गावांच्या विकासाकरिता ठक्कर बापा योजनेअंतर्गत सन २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यतेसह मंजुर करण्यात आली आहे. मात्र या सर्व कामांना आदिवासी विभागाकडून अद्यापी निधी उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने आदिवासी परिसरातील विकास खुंटलेला असल्यामुळे नागरिकात पसरत असलेला तीव्र असंतोष परिणामी या मंजूर कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच आदिवासी विकास विभागाने आदिवासी परिसरातील विकासाच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६३७५ | १० | ''राज्यामध्ये पेसा कायदा लागू करण्यात येणे, मात्र या कायद्याची अंमलबजावणी पाहिजे त्या प्रमाणात करण्यात येत नसल्याचे निदर्शनास येणे, पेसा अंतर्गत भरतीचा कायदा कागदावरच असणे, पेसा अंतर्गत भरती प्रक्रिया वगळून इतर क्षेत्रातील नोकर भरती सुरु असणे, न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून सामान्य प्रशासन विभागाकडून बीसीसी-1123/प्र.क्र.74/16-क 13/10/2023 च्या आदेशाने पेसा क्षेत्रातील नोकर भरती आदेश काढण्यास स्थगिती देण्यात आल्यामुळे आदिवासी समाजातील बेरोजगार युवकावरं अन्याय होत असल्याने याबाबत त्यांच्यात पसरत असलेला तीव्र असंतोष व भितीचे वातावरण परिणामी ईतर विभागात ज्याप्रमाणे नोकर भरती सुरू आहे त्याच पध्दतीने पेसा क्षेत्रातील आदिवासी भागातील नोकर भरती करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (३) | ६३५० | १०० | सन २०२३ मध्ये आदिवासी उमेदवारांकरिता पेसा कायद्यानुसार विविध विभागाच्या १७ संवर्गामधील भरतीची जाहिराती प्रसिद्ध करण्यात येणे, त्या जाहिरातीमध्ये पेसा व नॉन पेसा या दोन्ही संवर्गाची पदे रिक्त असणे, काही विभागाच्या परिक्षा झाल्या तर काहींच्या परिक्षासुद्धा अद्याप घेण्यात आलेल्या नसणे, तलाठी, वनरक्षक, शिक्षक व आरोग्यसेवक या पदांची पेसा भरतीचे सर्व प्रक्रिया पार पडली असूनही पेसा उमेदवारांची अंतिम निवडसूची व नियुक्ती आदेशाचा प्रश्न अद्याप सुटलेला नसणे, पेसा उमेदवारांना वगळून त्या जागी नॉन-पेसा उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येत असल्यामुळे पेसा उमेदवारांवर अन्याय होत असणे, जिल्हा परिषदेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पेसा भरतीचे चित्र यापेक्षा विदारक असणे, माहे ऑक्टोबर,२०२३ ला पशुधन पर्यवेक्षकेची परिक्षा घेण्यात येऊनही आजतागायत त्याचा निकाल जाहीर न करणे, अद्याप निकाल जाहीर न झाल्याने उमेदवार नैराश्याच्या गर्तेत ओढले जाणे, जिल्हा परिषदेंतर्गत पेसा भरतीतील आरोग्यसेवक, ग्रामसेवक यांच्या परिक्षाही अद्याप घेण्यात न येणे, यातच पेसा उमेदवारांचे भरतीचे वेळापत्रक प्रसिद्ध न करता केवळ नॉन पेसा उमेदवारांचे परिक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध केल्याने पेसा उमेदवारांमध्ये अन्याय व नैराश्येची भावना पसरलेली असल्याने, सुशिक्षित बेरोजगार आदिवासी संघटना, गडचिरोली यांनी त्यांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत निवेदनाद्वारे मागणी केली असणे, याबाबत पेसा उमेदवारांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४) | ६४९२ | १० | शहापूर व डोळखांब, ता.शहापूर, जि.ठाणे येथे कुपोषित बालके असून त्यांचे वजनही कमी असणे, ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्याची आवश्यकता असणे, त्याचप्रमाणे गरोदर महिला व स्तनदा मातांनाही सकस आहार देणे, सम बालकासाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करणे व त्यांना औषधोपचार देणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ३०,९३,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (५) | ६४७८ | १० | तालुका रावेर व यावल जिल्हा जळगाव येथील सातपुडा पर्वत रांगांमध्ये व पर्वताच्या पायथ्याशी आदिवासी लोक मोठ्या प्रमाणात वास्तव्य करून राहत आहेत. त्यात लोहारा ते कुसुंबा या दोन गावांना जोडणा-या सुकी नदीवरील पूल हा |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | गेल्या ४० ते ४५ वर्षापूर्वीचा असून त्याची उंची कमी असून जीर्ण झालेला आहे. त्यामुळे पावसाळयात रस्त्यावरील वाहतूकीच्या वेळेस नदीला पाणी आल्याने जिवीत हानी होण्याचा धोका नाकारता येत नाही. तसेच नदीपात्र खोल असल्याने दोन्ही बाजूच्या तटावर लोक वास्तव्य करत असून नदीला रात्री बेरात्री पूर आल्याने अनेकदा गुरे-ढोरे वाहून गेली आहेत. तसेच तट उंच असल्याने पूलावरून वाहने चालविणे मोठे जिकरीचे झालेले आहे. त्यासाठी लोहारा कुसुंबा रस्ता इजिमा १६ वर किमी ०/१०० मध्ये लोहारा गावाजवळ पुलाचे बांधकाम करणे ता. रावेर येथे आवश्यक आहे. सदर लोहारा कुसुंबा रस्ता इजिमा १६ वर किमी ०/१०० मध्ये लोहारा गावाजवळ पुलाचे बांधकाम करण्यासाठी तत्काळ परवानगी देण्यासंदर्भात संबंधितांना शासणाने करावयाची कार्यवाही |
| (६) | ६४८२ | १० | तालुका रावेर जिल्हा जळगाव येथील आदिवासी विभागातील रस्त्यांना प्रशासकीय मंजूरी असून त्या रस्त्याचा कार्यारंभ सुध्दा झालेला आहे. परंतु वन विभागाकडे परवानगी मिळणेकामी गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून प्रस्ताव वन विभागाकेड सादर केलेला असून अद्याप ही आदिवासी विकास विभागातील रस्त्यांच्या कामांना परवानगी न मिळाल्याने वाहन चालविणे जिकरीचे झालेले आहे. रस्त्यांची स्थिती अत्यंत बिकट असल्याने अपघात होवून जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी दि. २८ मे २०२४ रोजी आदिवासी बांधव व परिसरातील नागरिकांनी कुसुंबा फाटा ता. रावेर येथे रस्ता धरणे आंदोलन करण्यात आले होते.सदर रस्त्यांच्या कामांना तत्काळ परवानगी देण्यासंदर्भात संबंधित विषयांवर शासनाकडून करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (७) | ६३१८ | १० | आदिवासी विकास महामंडळाच्या साकडबाव व वेहळोली (ता.शहापूर जि.ठाणे) त्याच प्रमाणे सुगवे (ता.कर्जत जि.रायगड) या 3 भात खरेदी केंद्रात १४ हजार क्लिवंटल भाताची बोगस खरेदी झाल्याचे माहे डिसेंबर, २०२३ च्या दरम्यान उघडकीस आले असणे, तसेच माहे नोव्हें. २०२२-२०२३ मध्ये ५३ कोटी रुपयाचा बोगस भात खरेदी केला असणे, रायगड व ठाणे जिल्हयातील विविध गोदामाची तपासणी केली नसणे, साकडगाव, वेहळोली (ता.शहापूर जि.ठाणे) तसचे मौ.सुगवे ता.कर्जत जि.ठाणे) येथील गैरव्यवहाराची चौकशी झाली नसणे, संबंधित अधिका-यावर कठोर कारवाई करण्याची गरज असणे, अद्याप गुन्हा दाखल झाला नसणे, संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ६३१९ | १० | ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात आधारभुत भात खरेदी योजनेनुसार सन २०२४ च्या शहापुर तालुक्यात भात खरेदी केंद्रात हजारो क्विटल भाताची खरेदी केलेल्या १३ हजार ४४१ क्विंटल भातमध्ये सुमारे २ हजार ९९५ क्विंटल भाताच्या मालामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत तसेच ०७ हजार ५९९ बारदाणात तफावत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असल्याचे दि. ३० मे २०२४ वा त्या दरम्यान आढळून येऊन त्यामध्ये सूमारे ९८ लाख ०७ हजार रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे, सदर प्रकरणी आदिवासी विकास महामंडळाच्या केंद्र चालकांनी बनावट पावत्या बनवून शेतकऱ्यांची फसवणूक करुन भात मालाची ०१ कोटी रुपयाची तफावत आल्यामुळे आदिवासी विकास महामंडळाचे व्यवस्थापकांनी दि. २५ मे, २०२४ रोजी शहापूर तालुक्यातील किन्हवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला असणे, शहापूर तालुकयात अजुनही भात खरेदी केंद्र चालविले जात असल्यामुळे याची उच्चस्तरावर चौकशी होण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- ८१,९२,३५,४४,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (९) | ६४६६ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील मरेगाव खैरी पवनपार रस्ता ग्रामा-२६ वर संरक्षण काम सी.डी.रस्त्यांचे सुधारणा करणे या रस्त्याच्या बांधकामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |
| (१०) | ६४६७ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील मरेगाव खैरी पवनपार रस्ता ग्रामा-२६ संरक्षण काम सी.डी., सी.सी. रोड व सी.सी.नाल्याचे बांधकाम करणे, मरेगाव खैरी पवनपार रस्ता प्रजिमा ८० वर किमी १/०० सुधारणेसह संरक्षण भिंत व मोऱ्याचे बांधकाम करणे, रामा-३२२ ला जोडणाऱ्या चक आलेसूर(नैनपूर) ग्रामा-६ मध्ये किमी ०/०० ते २/५०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, मरेगाव खैरी पवनपार रस्ता ग्रामा-२६ वर किमी २/०० ते ३/०० वर सुधारणेसह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, देलनवाडी चिकनमिनघरी ते अंतरगाव ग्रामा-७० वर किमी ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, रत्नापूर खांडला सरांडी ग्रामा-०५ मध्ये किमी २/०० ते ५/०० वर सुधारणेसह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, रत्नापूर खांडला सरांडी ग्रामा-०५ ला जोडणाऱ्या पुरकेपार पोचमार्ग ग्रामा ०६ मध्ये रस्त्यांचे सुधारणा करणे, मोहाडी ते नवीन जामसाळा ग्रामा७७ किमी १/८०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, प्रजिमा ९ ते देलनवाडी नवरगाव रत्नापूर शिवणी प्रजिमा ४४ ला जोडणारा रस्ता किमी १३/२०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, रत्नापूर ते नाचनभट्टी ग्रामा.४६ मध्ये |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रस्त्यांचे सुधारणा करणे, रामाळा गडबोरी वासेरा रस्ता प्रजिमा ४३ किमी ३/५०० ते ५/५०० मध्ये रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, व्याहाड निफंद्रा मंगरमेंढा पालेवारसा सामदा एकारा प्रजिमा ३० किमी १७/०० ते १८/०० रस्त्यांचे सुधारणा करणे या सर्व रस्ते व पुलाच्या बांधकामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या व पुलांच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्या व पुलावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ६४७० | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील मरेगाव खैरी पवनपार रस्ता प्रजिमा ८० वर किमी १/०० सुधारणेसह संरक्षण भिंत व मोऱ्याचे बांधकाम करणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ६४७१ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील खैरी गुंजेवाही रस्ता ग्रामा-२७ मध्ये सुधारणासह संरक्षण भिंत व मोरीचे बांधकाम करणे या रस्त्याच्या बांधकामाबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ६४७२ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील रामा-३२२ ला जोडणाऱ्या चक आलेसूर(नैनपूर) ग्रामा-६ मध्ये किमी ०/०० ते २/५०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या रस्त्याच्या बांधकामाबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१४) | ६४७४ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील देलनवाडी चिकनमिनघरी ते अंतरगाव ग्रामा-७० वर किमी ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या रस्त्याच्या बांधकामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ६४७५ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील रत्नापूर खांडला सरांडी ग्रामा-०५ मध्ये किमी २/०० ते ५/०० वर सुधारणेसह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या रस्त्याच्या बांधकामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |
| (१६) | ६४७७ | १० | ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राअंतर्गत सिंदेवाही तालुक्यातील रत्नापूर खांडला सरांडी ग्रामा-०५ ला जोडणाऱ्या पुरकेपार पोचमार्ग ग्रामा ०६ मध्ये रस्त्यांचे सुधारणा करणे या रस्त्याच्या बांधकामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री यांना १२ जून २०२३ रोजी वा त्या सुमारास पत्राव्दारे मागणी केलेली असणे, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्यापही कार्यवाही न होणे, या रस्त्यावरुन प्रवाशांना प्रवास करतांना त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- ८१,९२,३५,४४,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१७) | ६४८९ | १० | राज्यात विविध आदिवासी शाळा असणे, आदिवासी शाळांना पोषण आहारात आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाला असणे, ही बाब माहे जून,२०२४ च्या पहिल्या आठवडयात उघडकीस आली असणे, उच्च दर्जाचा पोषण आहार देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१८) | ६४९० | १० | राज्यात अनुदानित आश्रमशाळांना संलग्न १५१ उच्च माध्यमिक आश्रमश शाळा सुरु असून आश्रम शाळेमध्ये उच्च माध्यमिक वर्ग सुरु करणे, अनुदानित आश्रम शाळेतील पुढील शिक्षण आदिवासी विकास विभागाअंतर्गत मुला-मुलींना शिक्षण देण्याची आवश्यकता असणे, सोयीसुविधा देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२११, कुटुंबकल्याण**<br>**रूपये:- ८१,९२,३५,४४,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१९) | ६३१७ | १० | नाशिक जिल्ह्यातील बागलाण, देवळा, दिंडोरी, इगतपुरी, कळवण, पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर या आदिवासी भागात मागील तीन वर्षांत मातामृत्यूचा दर घटल्याचे निदर्शनास येणे. नाशिक जिल्ह्यतील स्थानिक प्रशासनाची दखल शासनानी घेतली असणे, वर्ष २०२१-२०२२ मध्ये मातामृत्यूचे प्रमाण ५७ टक्के असून तेच प्रमाण मार्च, २०२४ मध्ये २४ टक्क्यांवर आणने, अशीच अंमलबजावणी, मातामृत्यू दर घटवण्यात कोणत्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केलेली असणे, २०२३-२०२४ या वर्षात पेठ, सुरगाणा, कळवण, इगतपुरी या तालुक्यांत मातामृत्यू दर कमी होणे, प्रशासनाने एकूण किती मातांना सकस आहार मिळविण्यासाठी प्रयत्न केलेले असणे, तसेच प्रधान मंत्री मातृवंदनेचा लाभ किती मातांपर्यंत पोचविण्यात नाशिक प्रशासनाला यश मिळाले असणे, भविष्यात नाशिक जिल्ह्यातील माता मृत्यूदर शून्यावर नेण्यासाठी शासनाची उपाययोजना प्रभावी ठरणे, नाशिक जिल्ह्याच्या धर्तीवर इतर संवेदनशील जिल्ह्यात राज्यातील मातामृत्यू दरात घट आणण्यासाठी प्रशासनाने घेतलेली जबाबदारी व कार्यपद्धती जाणून घेण्यासाठी या लक्षवेधी मार्फत मी शासनाचे लक्षवेधीत आहे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८०१, वीज**<br>**रूपये:- ८१,९२,३५,४४,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२०) | ६४५५ | १० | सुरगाणा तालुक्यात (जि.नाशिक) आदिवासी मोठया प्रमाणावर रहात असणे, ५६ गावांना विकृत कनेक्शन झाले नसणे, नव्याने अनेक आदिवासी वस्त्या स्थापिक झालेल्या असणे, ५६ आदिवासी वस्त्यांना वीज जोडणी देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, ५६ वस्त्यांना वीज जोडणीचे अंदाज पत्रके विभागीय कार्यालय कळवण व मंडळ कार्यालय मालेगाव यांनी मंजूर केले असणे, मात्र वीज जोडणी देण्यात आली नसणे, आदिवासी पाडयांना वीज जोडणी देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-११**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**<br>**रूपये:- १६,३३,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२१) | ६४५४ | १० | ठाणे जिल्हयातील माळशेज घाटालगत ३३ आदिवासी पाडे असून आदिवसी पाडयातील आदिवासी बांधव कुपोषणग्रस्त असणे, कुपोषण थांबविण्याची गरज असणे, आदिवासी वस्त्यावरील बेरोजगारी, दारिद्रे व कुपोषण थांबविण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, यासाठी शासनाने आदिवासी बांधवासाठी खावटी कर्ज योजना सुरु करणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक आदिवासी बांधवात निर्माण झालेला तीव्र असंतोष, खावटी कर्ज योजना सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ४ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) आदिवासी विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई